

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

गणेशोत्सवाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! एकदंत

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ | अंक - ३४७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### ‘लालपरी’ला नवा श्वास; पाच हजार नव्या बसेसची निविदा पूर्ण, पण प्रवाशांचा त्रास कधी संपणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात आता पाच हजार नव्या बसेस दाखल होणार आहेत. या बसेसच्या खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, सर्वांत कमी दराचा प्रस्ताव टाटा मोटर्सने दिल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. पुढील सहा महिन्यांत पाच हजारांहून अधिक जुन्या बसेस सेवेतून बाद होणार आहेत. सध्या १२ ते १४ वर्षे जुन्या बसेस दुरुस्त करून रस्त्यावर धाववल्या जात असल्याने वारंवार बिघाड, फेऱ्या रद्द होणे आणि प्रवाशांचा त्रास ही एसटीची रोजची समस्या बनली आहे. यापूर्वी २,६४० नव्या बसेस ताफ्यात दाखल झाल्या असून, आणखी तीन हजार ‘राजमाता जिजाऊ’ बसेस आणण्याची प्रक्रिया सुरू आहे. नव्या पाच हजार बसेस आल्यावर मागणीनुसार बसफेऱ्या वाढवण्याचा दावा महामंडळाने केला आहे.

मात्र नव्या बसेसची घोषणा पुरेशी नाही. वेळेवर बस, सुरक्षित प्रवास आणि ग्रामीण भागातील नियमित सेवा मिळणे हाच एसटीच्या आधुनिकीकरणाचा खरा कस असेल.

### कार सोडण्यासाठी ३ हजारांची लूट; टोइंग व्हॅनवरील कर्मचारी गजाआड, पैसे उकळले अन् पावतीही दिली नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

नो-पार्किंगमध्ये उभी केलेली कार टोइंग व्हॅनने उचलल्यानंतर ती सोडण्यासाठी वाहनचालकाकडून तीन हजार रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार कोरेगाव पार्कमध्ये समोर आला आहे. कारवर १० हजार रुपयांचा दंड होईल आणि आरटीओसह इतर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी भीती दाखवून टोइंग व्हॅनवरील चालकासह दोन कंत्राटी कर्मचाऱ्यांनी तीन हजार रुपये घेतले. विशेष म्हणजे, पैसे घेतल्यानंतर त्याची पावतीही देण्यात आली नाही.

# प्रत्येक शिक्षकाला वर्गातून थेट सर्वोच्च न्यायालयात उभे करणार का?

## ‘पॉस्को’चा गैरवापर रोखण्याची जबाबदारी सरकारची नाही का? शिक्षकांच्या संरक्षणासाठी स्पष्ट यंत्रणा कधी उभी राहणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

शाळेतील विद्यार्थ्याला शिस्त लावणे आणि विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार करणे यामध्ये कायदेशीरदृष्ट्या जमीन-अस्मानाचा फरक आहे. मात्र, हा फरक स्पष्ट करणारे नियम, शिक्षकांना मार्गदर्शन आणि चुकीच्या आरोपांपासून संरक्षण देणारी प्रभावी यंत्रणा सरकारने उभी केली आहे का? की एखाद्या शिक्षकावर गंभीर कलम लागल्यानंतर वर्षानुवर्षे न्यायालयीन लढाई लढणे हाच त्याचा एकमेव मार्ग उरला आहे?

शाळेतील विद्यार्थिनींना शारीरिक शिक्षा केल्याच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली आहे. शिक्षकाचे वर्तन अयोग्य आणि असंवेदनशील असले तरी, त्या कृतीमागे लैंगिक हेतू दिसत नसेल तर केवळ शारीरिक शिक्षेच्या आधारावर छॅरस्को कायद्यांतर्गत लैंगिक अत्याचाराचा गुन्हा ठरवता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यानंतर शिक्षकाविरुद्ध छॅरस्कोच्या कलम १० अंतर्गत सुरू असलेली कारवाई रद्द करण्यात आली.

हा निर्णय कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना मारहाण करण्याचे समर्थन करत नाही. शारीरिक शिक्षा चुकीचीच आहे आणि शाळांमध्ये तिच्यावर नियंत्रण असले पाहिजे. पण चुकीचे वर्तन आणि लैंगिक गुन्हा यांच्यातील कायदेशीर सीमारेषा पुसली गेली, तर त्याचा फटका शिक्षकांनाही आणि अखेरीस शिक्षणव्यवस्थेलाही बसू शकतो.

आजचा खरा प्रश्न याच ठिकाणी उभा राहतोप्रत्येक शिस्तभंगाच्या घटनेत शिक्षकाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यापूर्वी सरकारने प्राथमिक चौकशीची स्वतंत्र व्यवस्था का निर्माण करू नये?

छॅरस्कोसारखा गंभीर कायदा बालकांचे संरक्षण करण्यासाठी आहे. त्याची कठोरता हीच त्याची ताकद आहे. परंतु गंभीर कायद्याचा वापर करताना आरोपातील कृत्याला कायदेशीर गुन्ह्याचे आवश्यक घटक आहेत का, याची प्राथमिक पातळीवर वस्तुनिष्ठ तपासणी होणे तितकेच आवश्यक आहे. अन्यथा एखाद्या शिक्षकाला केवळ आरोपामुळे सामाजिक बदनामी, निलंबन, पोलीस चौकशी आणि दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते.

मग शिक्षकांचे संरक्षण कोण करणार?

सरकारने शिक्षकांसाठी स्पष्ट ‘ड्यूटी प्रोटोकॉल’ का तयार करू नये? वर्गात शिस्त राखताना शिक्षकाने कोणत्या पद्धती वापराव्यात, कोणत्या कृती पूर्णपणे निषिद्ध आहेत आणि विद्यार्थ्याशी अनुचित वर्तनाची तक्रार झाल्यास चौकशी कशी होईल, याचे स्पष्ट नियम का नसावेत?

शाळा व्यवस्थापन, शिक्षण विभाग आणि पोलीस यांच्यात समन्वय साधणारी प्राथमिक तक्रार निवारण यंत्रणा का उभी केली जात नाही? विद्यार्थ्यांचे संरक्षण आणि शिक्षकांचे न्याय्य संरक्षण हे परस्परविरोधी मुद्दे नाहीत. दोन्ही एकाच वेळी शक्य आहेत.

शिक्षकाने चुकीचे केले असेल तर कठोर कारवाई झालीच पाहिजे. पण चुकीचे केले नसताना गंभीर लैंगिक गुन्ह्याच्या आरोपाखाली शिक्षकाला वर्षानुवर्षे न्यायालयीन लढाई लढावी लागणे हीदेखील न्यायव्यवस्थेची आदर्श स्थिती नाही.

सर्वोच्च न्यायालयाला प्रत्येक प्रकरणात हस्तक्षेप करून कायदेशीर सीमा स्पष्ट कराव्या लागणार असतील, तर सरकारच्या धोरणनिर्मितीची गरज नेमकी कशासाठी?

बालकांना सुरक्षित शाळा हव्यातच; पण शिक्षकांनाही स्पष्ट नियम, निष्पक्ष चौकशी आणि कायदेशीर संरक्षण हवे. अन्यथा उद्या शिक्षक वर्गात शिस्त लावताना विद्यार्थ्याच्या वर्तनापेक्षा ‘माझ्यावर कोणते कलम लागू होईल?’ याचाच विचार करू लागला, तर त्याचा परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होणार नाही का?

पॉस्कोची कठोरता कायम ठेवा; पण न्यायाची समतोल तराजूही कायम ठेवा.

कारण विद्यार्थ्यांचे संरक्षण जितके महत्त्वाचे आहे, तितकेच निष्पाप शिक्षकाला आरोपी बनू न देणे हेही शासनाचे कर्तव्य आहे.

## वीज कंपन्यांच्या हिशेबाला सर्वोच्च न्यायालयाचा आरसा!

### दोन वर्षांनंतर थकबाकी मागता, मग ती इतकी वर्षे ‘एरिअर’ म्हणून कुठे होती?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

वीज ग्राहकाने बिल भरले नाही तर त्याच्यावर तातडीने दंड, व्याज आणि वसुलीची कारवाई केली जाते. मग वीज वितरण कंपन्यांच्या बिलिंग आणि लेखा व्यवस्थेला कायद्याची मुदत लागू होत नाही का? दोन वर्षांनंतर थकबाकी वसूल करायची असेल, तर ती रक्कम संबंधित बिलांमध्ये सातत्याने ‘एरिअर’ म्हणून दाखवली गेली पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

या निकालाने केवळ ग्राहकाच्या हक्काचा प्रश्न उपस्थित केलेला नाही, तर वीज कंपन्यांच्या अकाउंटिंग आणि बिलिंग व्यवस्थेवरही मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

एखाद्या ग्राहकाच्या नावावर जुनी थकबाकी आहे, तर ती संबंधित काळातील बिलांमध्ये स्पष्टपणे का दाखवली गेली नाही? बिल तयार करताना रक्कम वसुलीयोग्य थकबाकी म्हणून नोंदवली गेली होती का? नसल्यास वर्षानुवर्षांनी अचानक ग्राहकाच्या माथी लाखो रुपयांची थकबाकी कशी मारली जाते? सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलेला निकष वीज कंपन्यांसाठी गंभीर इशारा आहे. हिशेबात रक्कम दिसत नसेल, ग्राहकाला तिची माहिती दिलेली नसेल आणि दोन वर्षांनंतर अचानक मागणीपत्र येत असेल, तर त्या वसुलीची वैधता तपासलीच पाहिजे. यामुळे वीज वितरण कंपन्यांच्या जुन्या थकबाकीच्या नोंदींचे स्वतंत्र ऑडिट करण्याची गरज आहे का, हा प्रश्नही पुढे येतो. किती रक्कम खरोखर थकीत आहे आणि किती रक्कम केवळ जुन्या लेखापद्धतीतील त्रुटींमुळे ग्राहकांच्या खात्यावर दाखवली जात आहे? ग्राहकाकडून प्रत्येक पैशाचा हिशेब मागणाऱ्या कंपन्यांनी स्वतःच्या हिशेबाचाही तितकाच पारदर्शक हिशेब द्यायला नको का? सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय म्हणजे ग्राहकांना थकबाकी न भरण्याचा परवाना नाही; पण वीज कंपन्यांना मनमानी पद्धतीने जुनी देणी उकरून काढण्याचा अधिकारही नाही. आता खरी कसोटी त्यांच्या बिलिंग आणि अकाउंटिंग व्यवस्थेची आहे.

## बुलढाणा दुष्काळाच्या यादीतून का गायब? तुपकरांचा सरकारला इशारा; हेक्टरी १ लाख मदतीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
बुलढाणा : प्रतिनिधी

राज्य सरकारने १८ दुष्काळसदृश जिल्ह्यांची यादी जाहीर केली; मात्र त्यातून बुलढाण्याला वगळल्याने शेतकरी नेते रविकांत तुपकर आक्रमक झाले आहेत. जिल्ह्यात गेल्या ४५ ते ५० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांची अवस्था गंभीर असल्याचा दावा करत त्यांनी बुलढाण्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली.

दुष्काळाची पाहणी मंत्रालयातील वातानुकूलित दालनात बसून कागदावर केली जाते, असा आरोप करत तुपकरांनी सरकार आणि प्रशासनावर निशाणा साधला. शेतकऱ्यांच्या बांधावर या आणि पिकांची अवस्था पाहा, असे आव्हान त्यांनी दिले.

बुलढाण्याचा समावेश दुष्काळसदृश यादीत न करणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे असल्याचे त्यांनी म्हटले. शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

मागण्या मान्य न झाल्यास सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडण्याचा इशारा तुपकरांनी दिला आहे. त्यामुळे आता सरकारच्या दुष्काळ पाहणीच्या निकषांवर आणि मदतीच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## ओमानच्या समुद्रात भारतीय व्यापारी जहाजावर हल्ला; १३ खलाशी बचावले, एक भारतीय अद्याप बेपत्ता!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

पश्चिम आशियातील वाढत्या अस्थिरतेचा धोका आता आंतरराष्ट्रीय जलमार्गांपर्यंत पोहोचल्याचे चित्र आहे. ओमानच्या किनारपट्टीजवळ भारतीय व्यापारी जहाज ‘एमटी अल गैया’ वर रविवारी हल्ला झाल्याने खळबळ उडाली आहे. जहाजावर असलेल्या १४ भारतीय खलाशांपैकी १३ जणांची सुखरूप सुटका करण्यात आली असून, एका भारतीय नागरिकाचा अद्याप शोध सुरू आहे.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. व्यापारी जहाजे, खलाशी, नागरिक आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नसल्याचे भारताने स्पष्ट केले आहे. मस्कत येथील भारतीय दूतावासाने तातडीने हालचाली सुरू करत ओमानच्या प्रशासनाशी संपर्क साधला असून, बेपत्ता भारतीयाच्या शोध आणि बचाव मोहिमेवर लक्ष ठेवले आहे.

भारताने या भागातील तणाव तातडीने कमी करण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. आंतरराष्ट्रीय जलमार्गांवर मुक्त आणि सुरक्षित नौकानयन तसेच व्यापार सुरळीत राहणे ही केवळ संबंधित देशांची नव्हे, तर संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेची गरज आहे.

पश्चिम आशियातील संघर्ष वाढत असताना समुद्री मार्ग असुरक्षित होणे भारतासाठीही गंभीर इशारा आहे. तेलाची आयात, व्यापारी वाहतूक आणि आखाती देशांशी असलेले आर्थिक संबंध यावर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे समुद्रातील एका जहाजावरील हल्ल्याकडे केवळ स्थानिक घटना म्हणून पाहणे धोकादायक ठरेल.

# पश्चिम बंगालमध्ये २५२ मदरसे बंद करण्याचे आदेश; आणखी १०० संस्थांना कारण दाखवा नोटीस!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
कोलकाता : प्रतिनिधी

पश्चिम बंगालमध्ये मदरशांच्या मान्यता आणि पायाभूत सुविधांबाबत केलेल्या तपासणीनंतर राज्य सरकारने मोठी कारवाई केली आहे. राज्यातील २५२ मदरसे बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, आणखी सुमारे १०० मदरशांना कारण दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, जूनच्या सुरुवातीपासून राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये सरकारी आणि खासगी मदरशांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आले. या तपासणीत काही संस्थांकडे आवश्यक मंजुरी नसल्याचे, तर काही ठिकाणी मूलभूत पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे आढळून आल्याचा दावा सरकारने केला आहे.

अल्पसंख्याक व्यवहार आणि मदरसा शिक्षण विभागाचे मंत्री क्षुदीराम टुडू यांनी स्पष्ट केले की, आवश्यक मंजुरी असलेल्या



मदरशांना सुरू ठेवण्यात येईल. कारण दाखवा नोटीस मिळालेल्या संस्थांची उत्तरे तपासल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे.

मात्र या कारवाईकडे केवळ प्रशासकीय निर्णय म्हणून पाहणे पुरेसे नाही. शिक्षण संस्थांना नियम, मान्यता आणि मूलभूत सुविधांचे निकष लागू असतील, तर त्यांची अंमलबजावणी सर्व संस्थांवर समान पद्धतीने आणि पारदर्शकपणे झाली पाहिजे. अन्यथा कारवाईच्या नावाखाली निवडक संस्थांना लक्ष्य केल्याचा आरोप होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सरकारने अनधिकृत किंवा नियमबाह्य संस्था बंद करण्यामागील ठोस निकष, सर्वेक्षणाचा संपूर्ण तपशील आणि संबंधित संस्थांना दिलेल्या संधीची माहिती सार्वजनिक करणे गरजेचे आहे. कारवाई कायद्याच्या आधारे झाली आहे की राजकीय दबावातून, याचे उत्तर पारदर्शक प्रक्रियेतूनच मिळू शकते.

# भरती परीक्षा सुधारणा समिती नागपुरातच का?

## परीक्षार्थींचा मोठा वर्ग पुणे विभागात; मग संवादाचा केंद्रबिंदू नागपूर का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नागपूर : प्रतिनिधी

राज्यातील शासकीय भरती परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. परीक्षा पद्धती अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी विद्यार्थी, स्पर्धा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, कोचिंग क्लासेस आणि अभ्यासिका चालकांकडून सूचना मागविण्यात येत आहेत. मात्र, या प्रक्रियेच्या निमित्ताने एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहेराज्यातील स्पर्धा परीक्षार्थींचा मोठा वर्ग पुणे महसूल विभागात असताना समितीचा महत्त्वाचा संवाद कार्यक्रम नागपुरातच का?

समितीचे अध्यक्ष व सदस्य १६ सप्टेंबर रोजी नागपूरच्या नियोजन भवनात संवाद साधणार आहेत. नागपूर विभागातील संबंधित घटकांना सूचना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कक्षही स्थापन करण्यात आला आहे. ई-मेलद्वारेही अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

पण भरती परीक्षांचा प्रश्न केवळ नागपूर विभागापुरता मर्यादित नाही. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची मोठी परिसंस्था उभी राहिली आहे. हजारो विद्यार्थी वर्षानुवर्षे एमपीएससी आणि अन्य भरती परीक्षांची तयारी करतात. पेपरफुटी, परीक्षा केंद्रांवरील गैरप्रकार, तांत्रिक अडचणी, निकालातील विलंब, परीक्षा पुढे ढकलणे, पारदर्शकतेचा अभाव आणि तक्रार निवारण यांसारख्या प्रश्नांचा थेट अनुभव या विद्यार्थ्यांना आहे.

मग ज्या विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परीक्षा पद्धतीतील सुधारणांचा सर्वाधिक परिणाम होणार आहे, त्यांचा आवाज ऐकण्यासाठी पुण्यात स्वतंत्र संवाद का आयोजित केला जात नाही? पुणे महसूल विभागातील विद्यार्थी, पालक, क्लासेस, अभ्यासिका आणि विद्यार्थी संघटनांना प्रत्यक्ष समितीसमोर आपली बाजू मांडण्याची संधी मिळणार आहे का?

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे समितीचे अध्यक्षपद आणि प्रशासकीय निर्णयप्रक्रियेतील राजकीय प्रभावाबाबतही पारदर्शकता आवश्यक आहे. ही समिती विद्यार्थ्यांच्या हितासाठी आहे की प्रशासकीय सोयीसाठी? संवादाचे ठिकाण ठरविताना परीक्षार्थींची संख्या, परीक्षा केंद्रांची घनता, आंदोलनांचा इतिहास आणि प्रत्यक्ष अनुभव यांचा विचार झाला आहे का?

केवळ ई-मेलवर सूचना मागवून व्यापक विद्यार्थी सहभाग साध्य होईल, असे गृहित धरणे योग्य ठरेल का? ज्यांनी परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी प्रत्यक्ष अनुभवल्या आहेत, त्यांना थेट प्रश्न विचारण्याची संधी मिळणे अधिक महत्त्वाचे नाही का?

भरती परीक्षा सुधारण्याची प्रक्रिया कागदोपत्री समित्या, अहवाल आणि ई-मेलपुरती मर्यादित राहू नये. पुणे असो, नागपूर असो किंवा राज्यातील अन्य विभागप्रत्येक ठिकाणच्या परीक्षार्थ्यांचा आवाज समान महत्त्वाने ऐकला गेला पाहिजे.

सरकारने खरोखरच परीक्षा व्यवस्था पारदर्शक करण्याचा निर्धार केला असेल,

तर पुढचा प्रश्न स्पष्ट आहेपुणे महसूल विभागातही समितीचा प्रत्यक्ष संवाद कार्यक्रम कधी होणार?

कारण परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रश्न हा केवळ एका शहराचा नाही; तो त्यांच्या संपूर्ण भवितव्याचा प्रश्न आहे..

## संपादकीय

### टास्क फोर्सच्या शिफारशी की पुन्हा एकदा कागदी मलमपट्टी?

एमपीएससी परीक्षा सुधारणांवर थेट सवाल; प्रश्नपत्रिका फुटणार नाही याची हमी कोण देणार?

महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या भवितव्याशी संबंधित एमपीएससी परीक्षा व्यवस्था वारंवार संशयाच्या भोवऱ्यात सापडत असताना सरकारने टास्क फोर्सच्या माध्यमातून परीक्षा सुधारणांच्या काही शिफारशी पुढे केल्या आहेत. प्रश्नपत्रिका ऐनवेळी तयार करणे, परीक्षांचे वेळापत्रक किमान एक वर्ष आधी जाहीर करणे आणि परीक्षेपूर्वी रिक्त पदांची संख्या स्पष्ट करणे, या उपाययोजना वरकरणी आकर्षक वाटतात. पण मूळ प्रश्न असा आहे की, ज्या यंत्रणेकडून आधीच्या परीक्षा सुरक्षितपणे घेता आल्या नाहीत, त्याच यंत्रणेकडून नव्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी होणार याची हमी कोण देणार?

पेपरफुटी हा केवळ प्रश्नपत्रिका बाहेर जाण्याचा प्रकार नाही. तो संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाचा भंग आहे. एखादा विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतो, पालक त्यासाठी पैसा खर्च करतात, वयाची महत्त्वाची वर्षे स्पर्धेत घालवली जातात आणि ऐनवेळी पेपरफुटी किंवा परीक्षा रद्द झाल्याची बातमी येते. त्यावेळी नुकसान केवळ आर्थिक नसते; विद्यार्थ्यांचा वेळ, मानसिक तयारी आणि भविष्यातील संधीही धोक्यात येतात. त्यामुळे सरकारने टास्क फोर्सच्या शिफारशी जाहीर करण्यापेक्षा यापूर्वीच्या अपयशाची जबाबदारी कोणाची, हे आधी स्पष्ट करायला नको का?

**ऐनवेळी प्रश्नपत्रिका तयार करणे म्हणजे सुरक्षा हमी नव्हे**

प्रश्नपत्रिका शेवटच्या क्षणी तयार करण्याचा प्रस्ताव पेपरफुटी रोखण्याचा तांत्रिक उपाय म्हणून मांडला जात आहे. मात्र प्रश्नपत्रिका तयार होण्यापासून ती परीक्षा केंद्रावर पोहोचेपर्यंत अनेक टप्पे असतात. प्रश्ननिर्मिती करणारे तज्ज्ञ, डिजिटल प्रणाली, सर्व्हर, छपाई, वाहतूक, वितरण आणि परीक्षा केंद्रावरील प्रक्रिया प्रत्येक ठिकाणी मानवी हस्तक्षेप असतो.

मग प्रश्न असा की, गळतीचा धोका नेमका कोणत्या टप्प्यावर आहे, याचे स्वतंत्र ऑडिट झाले आहे का? प्रत्येक टप्प्यावर डिजिटल लॉग ठेवला जाणार आहे का? प्रश्नपत्रिकेपर्यंत कोणाला आणि किती वेळ प्रवेश होता, याची नोंद सार्वजनिक केली जाणार का? एखादी गळती झालीच तर जबाबदार अधिकारी निश्चित करण्याची व्यवस्था आहे का?

'ऐनवेळी प्रश्नपत्रिका तयार' हा शब्दप्रयोग ऐकायला आधुनिक आहे; पण त्यामागे सक्षम सुरक्षा यंत्रणा नसेल, तर जुन्या समस्येला नवे नाव देण्यापलीकडे त्याचे महत्त्व उरणार नाही.

**एक वर्ष आधी वेळापत्रक; पण परीक्षा खरंच वेळेवर होणार का?**

एमपीएससी परीक्षांचे वेळापत्रक किमान एक वर्ष आधी जाहीर करण्याची शिफारस विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची आहे. मात्र महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा अनुभव असा आहे की वेळापत्रक जाहीर होणे आणि त्या तारखेला परीक्षा होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

सरकार आणि आयोगाने आता एक प्रश्न स्पष्टपणे स्वीकारायला हवा जाहीर केलेल्या तारखेला परीक्षा झाली नाही तर जबाबदार कोण? वारंवार परीक्षा पुढे ढकलल्यास विद्यार्थ्यांना होणाऱ्या नुकसानीची भरपाई कशी होणार? वयाची मर्यादा ओलांडणाऱ्या उमेदवारांचे काय? एका परीक्षेच्या अनिश्चिततेमुळे पुढील अनेक परीक्षांचे नियोजन बिघडते, याची प्रशासनाला जाणीव आहे का?

विद्यार्थ्यांना आश्वासन नको; निश्चित तारीख आणि त्या तारखेचा सन्मान हवा आहे.

**रिक्त पदांची संख्या आधी जाहीर होणार, पण ती बदलली तर?**

परीक्षेपूर्वी रिक्त पदांची संख्या जाहीर करण्याची शिफारसही स्वागतार्ह आहे. पण येथेही सवाल आहे जाहीर केलेली पदसंख्या नंतर बदलली तर त्याचे कारण काय? विभागांकडून मागणीपत्रे वेळेत न आल्याने वर्षानुवर्षे पदे रिक्त राहणार असतील, तर एमपीएससी परीक्षा वेळेवर घेऊनही उपयोग काय?

सरकारी विभागांनी रिक्त पदांची माहिती देण्याची कायदेशीर आणि कालबद्ध जबाबदारी निश्चित केली जाणार आहे का? पदसंख्या कमी-जास्त करण्यासाठी पारदर्शक निकष असतील का? विद्यार्थ्यांना ही माहिती एका अधिकृत, सार्वजनिक डिजिटल प्रणालीवर उपलब्ध करून दिली जाणार का?

**टास्क फोर्सचा अहवाल पुरेसा नाही**

टास्क फोर्सने १५ दिवसांत शिफारशी केल्या म्हणून प्रश्न सुटत नाही. खरी कसोटी अहवालानंतर सुरू होते. प्रत्येक शिफारशीची अंमलबजावणी कधी होणार, त्यासाठी जबाबदार अधिकारी कोण, निधी किती आणि प्रगतीचा सार्वजनिक अहवाल कधी प्रसिद्ध होणार याची स्पष्ट रूपरेषा सरकारने जाहीर केली पाहिजे.

अन्यथा समिती नेमली, बैठक झाली, शिफारशी झाल्या आणि काही दिवसांनी विषय पुन्हा फाईलमध्ये गेला, अशी महाराष्ट्राच्या प्रशासनातील परिचित कथा पुन्हा घडू शकते.

**दोषींवर कारवाई नसेल तर सुधारणा कशासाठी?**

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे तो उत्तरदायित्वाचा. पेपरफुटी झाली तर केवळ परीक्षा रद्द करणे आणि विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यायला लावणे हा उपाय नाही. प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेतील दोष निश्चित होणे आणि दोषींवर वेगाने कारवाई होणे आवश्यक आहे.

पेपरफुटीच्या प्रकरणात कोणत्याही प्रभावशाली व्यक्तीला, संस्थेला किंवा एजन्सीला संरक्षण मिळणार नाही, याची स्पष्ट हमी सरकार देणार आहे का? तपास पूर्ण होण्याची कालमर्यादा काय? दोष सिद्ध झाल्यास संबंधितांना भविष्यात परीक्षा व्यवस्थेपासून दूर ठेवण्याची व्यवस्था आहे का?

विद्यार्थ्यांना सर्वांत आधी हेच पाहायचे आहे की नियम त्यांच्यासाठीच आहेत की नियम मोडणाऱ्यांसाठीही आहेत.

**विश्वास परत मिळविण्याची ही शेवटची संधी**

एमपीएससी परीक्षा व्यवस्था ही केवळ सरकारी भरतीची यंत्रणा नाही; ती महाराष्ट्रातील सामान्य कुटुंबातील तरुणांसाठी सामाजिक आणि आर्थिक उन्नतीचा मार्ग आहे. हा मार्ग जर पैशाने, ओळखीने, गळतीने किंवा प्रशासकीय निष्काळजीपणाने दूषित होत असेल, तर त्याचा फटका संपूर्ण समाजाला बसतो.

म्हणून टास्क फोर्सच्या शिफारशींकडे केवळ सुधारणा म्हणून पाहून चालणार नाही. प्रत्येक शिफारशीला कालमर्यादा, जबाबदार अधिकारी, सार्वजनिक अहवाल आणि अपयशाची निश्चित जबाबदारी जोडली गेली पाहिजे. प्रश्नपत्रिका ऐनवेळी तयार होईल, वेळापत्रक वर्षभर आधी जाहीर होईल, रिक्त पदांची संख्या सांगितली जाईल हे सर्व कागदावर छान दिसते. पण परीक्षा फुटली नाही, वेळेत झाली, निकाल वेळेत लागला आणि दोषींना शिक्षा झाली, तेव्हाच सुधारणा झाल्या असे म्हणता येईल. अन्यथा टास्क फोर्सच्या शिफारशी हा तरुणांच्या जखमेवरचा उपचार नसून जुन्याच व्यवस्थेवर केलेली नवी कागदी मलमपट्टी ठरेल. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना आता घोषणा नकोत; त्यांना एकच गोष्ट हवी आहे 'गुणवत्तेवर विश्वास ठेवा, व्यवस्था तुमच्याशी प्रामाणिक राहील' याची प्रत्यक्ष हमी.

# घनकचरा व्यवस्थापनाच्या विकेंद्रीकरणासाठी महापालिकेच्या १० जागा प्रस्तावित

## मोशी डेपोवरील भार कमी करण्यासाठी प्रभागनिहाय व्यवस्था; दुर्गंधविरहित ट्रान्स्फर स्टेशनसह अत्याधुनिक प्रक्रिया प्रकल्प उभारणार

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी : दि. १३ सप्टेंबर २०२६

पिंपरी-चिंचवड शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शाश्वत आणि विकेंद्रित करण्यासाठी महापालिकेने शहरातील विविध भागांतील १० जागा प्राथमिक स्तरावर प्रस्तावित केल्या आहेत. मोशी कचरा डेपोवरील वाढता कचऱ्याचा भार लक्षात घेता प्रभागनिहाय घनकचरा व्यवस्थापनाची यंत्रणा सक्षम करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

मोशी कचरा डेपोतील उपलब्ध जागा अपुरी पडत असल्याने शहराच्या विविध भागांत निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रभागनिहाय विकेंद्रीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार महापालिकेच्या आरक्षित जागांची स्थळपाहणी करण्यात आली असून, प्राथमिक तपासणीनंतर काही जागा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.



या जागांच्या क्षेत्रफळानुसार तेथे विविध घनकचरा प्रक्रिया सुविधा विकसित करण्याचे नियोजन आहे. यामध्ये कचरा वर्गीकरण व पुनर्वापर, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (चठऋ), ऊर्जा निर्मिती, जैविक कचऱ्यापासून बायोगॅस व बायोफ्युएल निर्मिती, तसेच प्लास्टिक कचऱ्यापासून उपयुक्त उत्पादने तयार करण्याच्या सुविधांचा समावेश असेल. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दुर्गंधविरहित ट्रान्स्फर स्टेशन उभारण्याचाही विचार आहे.

प्रस्तावित जागांची तांत्रिक योग्यता, उपलब्ध क्षेत्रफळ, वाहतूक व्यवस्था, पर्यावरणीय बाबी आणि इतर आवश्यक निकषांची तपासणी सुरू आहे. सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून आवश्यक त्या संमती व मान्यता घेतल्यानंतर अंतिम जागा निश्चित करण्यात येणार आहेत.

या विकेंद्रित व्यवस्थेमुळे कचऱ्याची वाहतूक अधिक कार्यक्षम होण्याबरोबरच मोशी कचरा डेपोवरील भार कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच शहरातील कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने वर्गीकरण, प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्याची यंत्रणा अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे.

प्रस्तावित जागांच्या क्षेत्रफळानुसार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दुर्गंधविरहित ट्रान्स्फर स्टेशन, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (चठऋ), बायोगॅस, बायोफ्युएल तसेच प्लास्टिकपासून उपयुक्त उत्पादने तयार करण्यासंदर्भातील विविध प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. प्रत्येक जागेची तांत्रिक व व्यवहार्यता तपासणी सुरू असून सर्व संबंधित बाबींचा विचार करून अंतिम निर्णय घेतला जाईल.

**प्रस्तावित जागा**

- ✻ प्रभाग क्रमांक १३, सेक्टर क्रमांक २२, पाण्याच्या टाकीजवळ
- ✻ प्रभाग क्रमांक १७, चिंचवड, आरक्षण क्र. १/८९, सर्व्हे नं. ११३, ११४ व ११६ पैकी
- ✻ प्रभाग क्रमांक १८, चिंचवड, आरक्षण क्र. २२१
- ✻ प्रभाग क्रमांक १०, दत्तनगर, राम मंदिराजवळ
- ✻ सर्व्हे नं. ७७, दिघी गायरान
- ✻ चोविसावाडी, आरक्षण क्र. २/१६
- ✻ पुनावळे, सर्व्हे नं. २३/६/३ पै., २३/६/२ पै., २३/५ पै., २३/१ पै., २३/६/४ पै., २३/२/१ पै. व २३/२/२
- ✻ पुनावळे, सर्व्हे नं. २६/१/६, २६/३/१ व २६/३/२ पै.
- ✻ गवळीमाथा
- ✻ खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील जागेबाबत सकारात्मक चर्चा सुरू आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी विकेंद्रीकरणावर भर देण्यात येत आहे. मोशी डेपोवरील कचऱ्याचा भार कमी करण्यासोबतच कचऱ्याचे संकलन, वाहतूक, वर्गीकरण आणि प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्याचे नियोजन आहे. प्रस्तावित जागांची तांत्रिक तपासणी केल्यानंतर महापौर, सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व नगरसदस्य यांच्या संमतीने अंतिम जागा निश्चित केल्या जातील. पर्यावरणपूरक आणि नागरिकांना कमीत कमी त्रास होईल, अशा पद्धतीने प्रकल्प उभारण्यात येतील.

**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

# अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस व सप्ताहाच्या नियोजनासाठी मंगळवारी बैठक

## महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची विशेष उपस्थिती

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

मराठी भाषेला केंद्र शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेचा दर्जा दिल्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' आणि 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' व्यापक स्वरूपात साजरा करण्याच्या दृष्टीने मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे. महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या विशेष उपस्थितीत सकाळी ११ वाजता महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात ही बैठक होणार आहे.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस', तर ३ ते ९ ऑक्टोबर हा कालावधी 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात येत असून, त्यांची रूपरेषा, स्वरूप आणि व्याप्ती निश्चित करण्यासाठी या बैठकीत सर्वंकष चर्चा होणार आहे.

बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्यासह महापालिकेचे पदाधिकारी व अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

**साहित्यिक, संस्थांना सहभागाचे आवाहन**

मराठी भाषेचा समृद्ध भाषिक व सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसारासाठी कार्य करणारे साहित्यिक, भाषा संवर्धक, प्रचारक तसेच कला, साहित्य, सांस्कृतिक आणि अन्य क्षेत्रातील संस्था व व्यक्तींनी या नियोजन बैठकीस उपस्थित राहून आपल्या सूचना व संकल्पना मांडाव्यात, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस आणि सप्ताह शहरात व्यापक स्वरूपात साजरा करताना मराठी भाषेचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, तसेच भाषेच्या प्रचार, प्रसार आणि संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी दिली.

# कोरियाचा ४-१ ने धुव्वा! भारताचा आशिया चषकावर विक्रमी सहावा मुकुट; विश्वचषकाचे तिकीटही पक्के

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**मोकी, चीन : वृत्तसंस्था**

भारतीय कनिष्ठ पुरुष हॉकी संघाने पुन्हा एकदा आशियावर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. रविवारी, १३ सप्टेंबर रोजी झालेल्या अंतिम सामन्यात भारताने कोरियाचा ४-१ असा दणदणीत पराभव करत कनिष्ठ आशिया चषकावर विक्रमी सहाव्यांदा कब्जा केला. या विजयासोबतच भारताने आगामी विश्वचषक स्पर्धेतील आपले स्थानही निश्चित केले आहे.




चीनमधील मोकी येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत सामन्यावर पकड निर्माण केली. कोरियाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय खेळाडूंनी सातत्यपूर्ण दबाव कायम ठेवत सामन्याचे पारडे पूर्णपणे आपल्या बाजूने झुकवले. अखेरीस भारताने ४-१ असा स्पष्ट विजय मिळवत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

भारताने यापूर्वी २००४, २००८, २०१५, २०२३ आणि २०२४ मध्ये कनिष्ठ आशिया चषक जिंकला होता. यंदाच्या विजेतेपदामुळे भारताच्या खात्यात सहावा आशिया चषक जमा झाला असून, या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वाधिक यशस्वी संघ म्हणून भारताचे स्थान आणखी भक्कम झाले आहे.

विशेष म्हणजे, भारताने मागील विजेतेपदाचेही यशस्वीपणे संरक्षण केले आहे. त्यामुळे हा विजय केवळ आणखी एका चषकाचा नाही, तर भारतीय कनिष्ठ हॉकीच्या सातत्यपूर्ण वर्चस्वाचा दाखला आहे.

आता आशियाई विजेतेपदाची मोहीम पूर्ण झाली असून भारतीय खेळाडूंचे लक्ष्य जागतिक मंचावर पदक मिळवण्याचे असेल. आशियावर राज्य केल्यानंतर भारतीय हॉकीच्या या नव्या पिढीसमोर आता विश्वचषकाचे आव्हान उभे आहे.

# गणेशोत्सवातही फुलांचे भाव कोसळले; आंबेगाव-जुन्नरमधील फूल उत्पादक संकटात

## मजुरी, खते-औषधांचा खर्चही निघेना; पावसाच्या दडीमुळे खरीप पिकांचीही चिंता

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या काळात फुलांना मोठी मागणी असतानाही बाजारभावात प्रचंड घसरण झाल्याने आंबेगाव-जुन्नर तालुक्यातील फूल उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. फुलांना मिळणाऱ्या दरातून मजुरीचा खर्चही भरून निघत नसल्याने उत्पादकांसमोर मोठे आर्थिक आव्हान उभे राहिले आहे.

आंबेगाव व जुन्नर तालुक्यांत टोमॅटो, कांदा, कोबी, फ्लॉवर या नगदी पिकांसोबत खरीप व रब्बी हंगामात झेंडू (गोंडा), बिजली, बिजलीचे विविध प्रकार तसेच शेवंतीची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. गेल्या दोन वर्षांत फुलांना चांगला बाजारभाव मिळाल्याने भांडवली खर्च आणि मजुरीचा खर्च वसूल होऊन ही पिके शेतकऱ्यांना परवडत होती.

मात्र, यंदा श्रावण महिना आणि गणेशोत्सव सुरू असतानाही फुलांचे बाजारभाव अपेक्षेप्रमाणे वाढलेले नाहीत. उलट बाजारभाव मोठ्या प्रमाणात घसरल्याने उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. खते व औषधांच्या वाढलेल्या किमती, पुणे-मुंबई बाजारपेठेपर्यंतचा वाहतूक खर्च, फुलांची तोडणी आणि अंतर्गत मशागतीचा खर्च यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.



फुलांचा बाजारभाव शेतकऱ्यांच्या हातात नसल्याने उपलब्ध भावातच माल विकण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय राहत नाही. फुले वेळेत तोडली नाहीत तर फुलगळ होऊन उत्पादनात घट होते. त्यामुळे कमी भाव असतानाही शेतकऱ्यांना वेळेत फुले तोडून बाजारात पाठवावी लागतात. परिणामी उत्पादन खर्च वाढत असून उत्पन्न मात्र घटत आहे.

त्यातच गेल्या महिनाभरापासून पावसाने उघडीप दिल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. फुलपिकांसह इतर खरीप पिकांनाही पाण्याची गरज असून आदिवासी भागातील भातशेतीसाठी सध्या पावसाची नितांत आवश्यकता आहे.

गणेशोत्सवात फुलांना मागणी वाढेल आणि चांगला दर मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र बाजारभाव कोसळल्याने मजुरीचा खर्चही वसूल होत नाही. खते, औषधे, वाहतूक आणि तोडणीचा वाढलेला खर्च लक्षात घेता फूल उत्पादकांचे मोठे नुकसान होत आहे. त्यातच पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांचीही चिंता वाढली आहे, अशी माहिती शिनोली येथील प्रगतिशील फूल उत्पादक शेतकरी निलेश बोराडे-बोऱ्हाडे यांनी दिली.

# चक्रधरस्वामी जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन



**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

थोर समाजसुधारक संत भगवान सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामी यांची जयंती पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज साजरी करण्यात आली. यानिमित्त पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील श्री चक्रधरस्वामी यांच्या प्रतिमेस उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक एकता आणि स्त्री-पुरुष समानतेसाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या श्री चक्रधरस्वामी यांची जयंती शासकीय कार्यालयांमध्ये साजरी केली जाते. त्यांनी आपल्या विचारांतून साधेपणा, अध्यात्म, भक्ती यांसोबतच समाजातील समता, मानवता आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला. श्री चक्रधरस्वामी यांचे व्यापक आणि समतावादी विचार आजही समाजाला मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

### सारांश वृत्त

**भगवान वराह जयंतीनिमित्त पुण्यात भव्य मिरवणूक उत्साहात संपन्न**

**ढोल-ताशांच्या गजरात भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग; पृथ्वी व पर्यावरण संवर्धनाचा संदेश**

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

भगवान श्री वराह जयंतीनिमित्त सकल हिंदू समाज, पुणे यांच्या वतीने रविवारी (१३ सप्टेंबर) भवानी पेठ परिसरात भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. कस्तुरे चौक येथून सुरू झालेल्या या मिरवणुकीचा समारोप भवानी पेठ येथील श्री बालाजी मंदिरात झाला.

ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मिरवणुकीदरम्यान भगवान श्री वराह देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. धर्म, संस्कृती आणि सामाजिक एकजुटीचा संदेश देणाऱ्या या सोहळ्यामुळे भवानी पेठ परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

भगवान विष्णूंच्या वराह अवताराची कथा पृथ्वीच्या संरक्षणाशी जोडली जाते. याच पार्श्वभूमीवर वराह जयंतीच्या माध्यमातून पृथ्वी संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि भूमीच्या महत्त्वाचा संदेश देण्यात आला.

वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि जागतिक तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर पृथ्वीचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, तसेच भूमी संवर्धन आणि सेंद्रिय शेतीचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# पावसाअभावी शिरदाळे परिसरातील बटाटा पीक करपले

## उत्पन्नाचे प्रमुख साधन धोक्यात; नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शिरदाळे परिसरात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने पावसाळी बटाटा पिकाला मोठा फटका बसला आहे. पाण्याअभावी बटाट्याची पाने सुकून करपू लागल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून, बटाटा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

शिरदाळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी पावसाळी बटाट्याची लागवड केली होती. यंदा पावसाचे आगमन उशिरा झाल्याने सुरुवातीच्या टप्प्यातच लागवडीवर परिणाम झाला. त्यानंतर झालेल्या पावसामुळे पिकाची वाढ समाधानकारक झाली होती. मात्र, गेल्या महिनाभरापासून पावसाने पुन्हा ओढ दिल्याने बटाटा पिकाला आवश्यक ओलावा मिळत नसल्याचे चित्र आहे.

शिरदाळे परिसर हा डोंगर-पठाराचा भाग असल्याने येथील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाने दडी मारल्यास खरीप पिकांसह बटाटा पिकालाही त्याचा थेट फटका बसतो. सध्या



अनेक शेतांमध्ये बटाट्याची पाने सुकून करपू लागली असून, पिकाची वाढ आणि कंदांची प्रतिकूल वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

बटाटा हे या परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या वर्षभरातील महत्त्वाच्या उत्पन्नाचे साधन आहे. बियाणे, खते, औषधे, मशागत तसेच मजुरीवर मोठा खर्च केल्यानंतर पिकाला पाण्याअभावी फटका बसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची शक्यता आहे. आधीच वाढलेला उत्पादन खर्च आणि त्यात पावसाची अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

दरम्यान, महसूल आणि कृषी विभागाने शिरदाळे परिसरातील बटाटा पिकांची तातडीने पाहणी करून नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करावेत, तसेच पात्र शेतकऱ्यांना शासनाकडून तातडीने नुकसानभरपाई व आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी बटाटा उत्पादक शेतकरी बाबाजी चौधरी, राघू रनपिसे, सचिन तांबे, संदीप मिंडे, सिद्धार्थ तांबे तसेच माजी उपसरपंच मयूर सरडे यांनी केली आहे.

### गणेशोत्सवाच्या साहित्याने लोणी-धामणी परिसरातील बाजारपेठा सजल्या

## गणेशमूर्ती, सजावटीचे साहित्य खरेदीसाठी नागरिकांची लगबग; कांद्याच्या दरवाढीमुळे यंदा उत्साहात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी : प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील लोणी, धामणी परिसरातील गावांच्या बाजारपेठा विविध प्रकारच्या गणेशोत्सव साहित्याने सजल्या आहेत. गणेशमूर्तींसह घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सवासाठी आवश्यक सजावटीचे साहित्य बाजारात उपलब्ध झाले असून, खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू झाली आहे.

गणेशमूर्ती बसविण्यासाठीचे पाट, मेघडंबरी, कृत्रिम हार-फुले, रांगोळी, विविध रंगांचे पूजासाहित्य, आकर्षक विद्युत रोषणाईची उपकरणे, पांढरे, लाल व हिरव्या रंगांचे कापड, उपरणे, मुकुट तसेच सजावटीसाठी लागणारे विविध साहित्य दुकानांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे. गौरीच्या मुखवट्यांसह गौरी



सजावटीचे साहित्यही बाजारात दाखल झाले आहे.

गणेशोत्सवाचे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठांमध्ये पूर्वीप्रमाणे मोठी गर्दी दिसत नसली, तरी पुणे, मुंबईसह इतर शहरांमध्ये वास्तव्यास असलेले नागरिक गावी येताना गणेशोत्सवाचे साहित्य खरेदी करून नेत आहेत. परिसरातील नागरिकांकडूनही लोणी व धामणी बाजारपेठेतूनच गणेशोत्सवाचे साहित्य खरेदी करण्यास पसंती दिली जात आहे. दरम्यान, परिसरातील अनेक गावांमध्ये गणेशमूर्तींचे स्टॉलही थाटण्यात आले आहेत. गणेशभक्त आपल्या आवडीची मूर्ती निवडून त्यावर आपल्या नावाचे लेबल लावत आहेत. विविध आकार, आकर्षक रंगसंगती आणि सजावटीच्या गणेशमूर्तींमुळे स्टॉल परिसरातही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**कांद्याच्या दरवाढीमुळे उत्साह वाढला**

यंदा कांद्याच्या बाजारभावात गेल्या महिनाभरात मोठी वाढ झाल्याने परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. कांद्याला मिळालेल्या चांगल्या भावामुळे यंदाचा गणेशोत्सव अधिक उत्साहात आणि धूमधडाक्यात साजरा करण्याचा शेतकऱ्यांचा मानस असल्याच्या प्रतिक्रिया कांदा उत्पादकांनी व्यक्त केल्या. .

# काठापूर बुद्रुक येथे महादेव मंदिराचा कलशारोहण सोहळा उत्साहात

### ग्रामस्थांच्या पुढाकारातून साडेतीनशे वर्षे जुन्या मंदिराचा जीर्णोद्धार

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी । वृत्तसंस्था

काठापूर बुद्रुक (ता. आंबेगाव) येथील घोडनदीच्या पात्रातील साडेतीनशे वर्षे जुन्या पुरातन महादेव मंदिराचा कलशारोहण सोहळा ह.भ.प. पांडुरंग महाराज येवले यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. या सोहळ्यास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काठापूर बुद्रुक येथील घोडनदीच्या पात्रात असलेल्या या पुरातन महादेव मंदिराचा कळस मागील अनेक वर्षांपासून खंडित झाला होता. तसेच मंदिराची पडझड झाल्याने त्याचा जीर्णोद्धार करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. मंदिराचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन ग्रामस्थांनी एकत्र येत जीर्णोद्धाराचे काम हाती घेतले. जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाल्यानंतर कलशारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या वेळी ह.भ.प. पांडुरंग महाराज येवले यांच्या हस्ते विधिवत कलशारोहण करण्यात आले. ह.भ.प. जालिंदर महाराज करंडे यांची प्रवचन सेवा झाली. धार्मिक वातावरणात झालेल्या या सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, उद्योजक रमेश येवले, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अरुण गिरे, पंचायत समिती सदस्या श्वेता ढोबळे, बाळासाहेब घुले, सरपंच अशोक करंडे, काठापूर खुर्दच्या सरपंच सीमा थिटे, माजी सरपंच रघुनाथ करंडे, बाळशिराम करंडे, पोलीस पाटील अमोल करंडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काठापूर बुद्रुक गावाला ऐतिहासिक वारसा लाभला असून, गाव परिसरात अनेक पुरातन वास्तू व मंदिरे आहेत. होळकर काळात या वास्तू आणि मंदिरांची उभारणी झाल्याचे सांगितले जाते.

घोडनदीच्या पात्रातील महादेव मंदिराची कालांतराने पडझड झाली होती. ग्रामस्थांनी एकजुटीने पुढाकार घेत मंदिराचा जीर्णोद्धार केल्याने पुरातन धार्मिक वारशाचे जतन झाले आहे. पूर्ण झालेल्या मंदिराचा कलशारोहण सोहळा उत्साहात पार पडल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीवरुन राजकीय वातावरण तापले

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीवरून जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (पीडीसीसी) निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होताच जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकारणाला चांगलीच उकळी फुटली आहे. एकूण २१ संचालक पदांसाठी होणाऱ्या या निवडणुकीआधी ठरावांचा खेळ चांगलाच रंगला असून, 'अ' वर्गातील १३७७ विकास सोसायट्यांचे ठराव या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहेत.

सविस्तर वृत्त आणि महत्त्वाचे मुद्दे:जोरदार फिल्डिंग व गावोगावी बैठका: सोसायट्यांचे प्रतिनिधी आपल्या बाजूने वळवण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी जोरदार मोर्चेबांधणी (फिल्डिंग) सुरू केली आहे. गावोगावी बैठका आणि भेटीगाठींचे सत्र वेगाने सुरू आहे.

पैशांच्या व्यवहारांची चर्चा आणि तक्रारी: शिरूर आणि खेड तालुक्यात ठरावांवरून वाद निर्माण झाले आहेत. ठरावांसाठी पैशांचे व्यवहार होत असल्याच्या चर्चांमुळे सहकार क्षेत्रात मोठी खळबळबळ उडाली असून, या संदर्भात तक्रारी आणि गुन्हे दाखल करण्याची माहिती समोर येत आहे.अजित पवार गट विरुद्ध भाजप: या निवडणुकीत नेहमीप्रमाणे अजित पवार गटाचे वर्चस्व कायम राहणार की भारतीय जनता पक्ष (भाजप) नवीन राजकीय समीकरणे उभारणार, याकडे आता संपूर्ण पुणे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात वाहतुकीत मोठे बदल

### छत्रपती शिवाजी रस्ता वाहतुकीसाठी बंद; १२ प्रमुख मार्गांवर अवजड वाहनांना २४ तास 'नो-एंट्री'

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाचे बदल केले आहेत. गणेशमूर्ती खरेदी तसेच विसर्जन मिरवणुकीदरम्यान होणारी गर्दी लक्षात घेऊन शहरातील काही प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले असून, वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

**छत्रपती शिवाजी रस्ता बंद**

छत्रपती शिवाजी रस्त्यावरील गाडगीळ पुतळा चौक ते गोटीराम भैय्या चौक हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. या मार्गावरील वाहनचालकांनी गाडगीळ पुतळा चौकातून संताजी घोरपडे पथ, कुंभारवेस चौक आणि शाहीर अमर शेख चौक या मार्गाचा वापर करावा.

शिवाजीनगरकडून स्वारगेटच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना एस. जी. बर्वे चौकातून डावीकडे वळण्यास बंदी घालण्यात आली आहे. संबंधित वाहनांनी जंगली महाराज रस्ता, खंडोजी बाबा चौक आणि टिळक चौकमार्गे पुढे जावे.

**सारसबाग-सिंहगड रस्त्यावर नो-पार्किंग**

सारसबाग परिसरातील सावरकर पुतळा चौक ते समाधान भेल सेंटर या दरम्यान दोन्ही बाजूंनी




वाहतूक सुरू राहणार आहे. मात्र, या संपूर्ण परिसरात नो-पार्किंग लागू करण्यात आले आहे. त्यामुळे वाहनचालकांनी रस्त्यावर वाहने उभी करू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**१२ प्रमुख मार्गांवर अवजड वाहनांना बंदी**

गणेशोत्सवाच्या काळात १२ ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मध्यवर्ती पुण्यातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी १२ प्रमुख मार्गांवर अवजड व जड वाहनांना २४ तास प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

या मार्गांमध्ये लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता, शिवाजी रस्ता, केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता आणि शास्त्री रस्ता यांसह मध्यवर्ती भागातील प्रमुख रस्त्यांचा समावेश आहे.

**गणपती खरेदीसाठी पार्किंगची व्यवस्था**

गणपती खरेदीसाठी शहरात येणाऱ्या नागरिकांसाठी काही ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. मित्रमंडळ चौक ते पाटील प्लाझा, जमनालाल बजाज पुतळ्याच्या डाव्या बाजूस तसेच निलयम ब्रिज ते सिंहगड रोड जंक्शन दरम्यान वाहनतळाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने आणि पोलीस वाहने यांसारख्या अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना वाहतूक निर्बंधांतून सूट देण्यात आली आहे. नागरिकांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जुन्नर न्यायालयातील राष्ट्रीय लोकअदालतीत ६,८२३ प्रकरणांचा तडजोडीने निपटारा

## ४ कोटी ३९ लाख २६ हजार २८७ रुपयांची वसुली; २२ वर्षे जुने भूसंपादन प्रकरणही निकाली

■ दैनिक राज्य लोकतंत्र
जुन्नर : प्रतिनिधी

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या सौजन्याने आणि तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्या वतीने जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, जुन्नर येथे आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत तब्बल ६ हजार ८२३ प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणांचा आपसी समझोता व तडजोडीने निपटारा करण्यात आला. या प्रकरणांतून एकूण ४ कोटी ३९ लाख २६ हजार २८७ रुपयांची वसुली करण्यात आली.

राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, जुन्नरचे जिल्हा न्यायाधीश एस. बी. शेलार यांच्या हस्ते झाले. 'न्याय आपल्या दारी' या संकल्पनेनुसार विधी सेवा प्राधिकरण नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. पक्षकारांनी लोकअदालतीच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली काढून वेळ आणि पैसा वाचवावा, असे आवाहन शेलार यांनी केले.

लोकअदालतीमध्ये वाहनांवरील दंड, दिवाणी व फौजदारी दावे, दाखलपूर्व बँक वसुली प्रकरणे, ग्रामपंचायत, महावितरण, पतसंस्था आणि फायनान्स संस्थांशी संबंधित प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. चार पॅनलच्या माध्यमातून दोन्ही बाजूंच्या पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेत समेट घडवून आणण्यात आला.

**२२ वर्षे जुने भूसंपादन प्रकरण निकाली**

या लोकअदालतीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे २२ वर्षांपासून प्रलंबित असलेले भूसंपादनाचे प्रकरण तडजोडीने निकाली काढण्यात आले. या प्रकरणात भूधारकांना ३१ लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम मिळवून देण्यात



आली. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रकरणाचा तडजोडीने निकाल लागल्याने संबंधित पक्षकारांना मोठा दिलासा मिळाला.

लोकअदालतीच्या कामकाजात जिल्हा न्यायाधीश एस. बी. शेलार यांच्या न्यायालयात काही पक्षकार व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर झाले. त्यामुळे प्रत्यक्ष न्यायालयात उपस्थित राहण्याची पक्षकारांची अडचण कमी झाली.

यावेळी दिवाणी वरिष्ठ न्यायाधीश ए. एम. हुसेन, द्वितीय सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश अनंत एच. बाजड, तृतीय दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) रंजना जी. कुंभार, जुन्नर वकील बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. संतोष लोहके, उपाध्यक्ष निलीमा शेरकर, सचिव पुराणिक नलावडे, तसेच लोकअदालत पॅनल सदस्य ॲड. वर्षा टिंगरे, ॲड. शिवाजी केदार, ॲड. लता वायाळ आणि ॲड. करमेश गाडेकर उपस्थित होते. समर्थ लॉ कॉलेज, बेल्हे येथील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनीही लोकअदालतीच्या कामकाजात सहभाग घेतला.

राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जुन्नर वकील बार असोसिएशनचे सदस्य, पोलीस अधिकारी व कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, पंचायत समिती, बँका, ग्रामपंचायती, महावितरण, पतसंस्था, फायनान्स संस्था तसेच पक्षकारांचे सहकार्य लाभले.

## सारांश वृत्त

### दिल्लीतील हॉटेलमध्ये एअर इंडियाच्या वैमानिकाचा मृत्यू; पोलिसांकडून घातपाताची शक्यता फेटाळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । प्रतिनिधी

एअर इंडियाच्या एका वैमानिकाचा दिल्लीतील वसंत कुंज परिसरातील हॉटेलच्या खोलीत मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. १० सप्टेंबर रोजी संबंधित वैमानिक हॉटेलमध्ये दाखल झाला होता. मात्र, दुसऱ्या दिवशी संध्याकाळी तो खोलीत मृतावस्थेत आढळला. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू केला असून, प्राथमिक तपासात घातपात झाल्याचे कोणतेही पुरावे आढळले नसल्याचे स्पष्ट केले आहे.

मृत वैमानिक यापूर्वी एअर इंडिया एक्स्प्रेसमध्ये कार्यरत होता. सध्या तो मोठ्या आकाराच्या बोईंग ७८७ विमानांचे संचालन करण्यासाठी आवश्यक असलेल्या रूपांतर प्रशिक्षणातून जात होता, अशी माहिती विमान कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

हॉटेलमध्ये मुक्कामादरम्यान अचानक झालेला हा मृत्यू विमान वाहतूक क्षेत्रातही चर्चेचा विषय ठरला आहे. वैमानिकासारख्या अत्यंत जबाबदारीच्या पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीचा अशा प्रकारे मृत्यू होणे निश्चितच गंभीर बाब आहे.

पोलिसांनी घातपाताची शक्यता नाकारली असली, तरी मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणे महत्त्वाचे आहे. शवविच्छेदन आणि इतर तपासातून मृत्यूमागील कारण समोर येण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे प्राथमिक निष्कर्षापलीकडे जाऊन सखोल तपास पूर्ण होणे गरजेचे आहे.

# पश्चिम आशियात युद्धाची धग, दिल्लीत इराण–यूएई संवाद; भारतासमोर कूटनीतीसोबत तेलाचीही परीक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

पश्चिम आशियात संघर्षाची धग कायम असताना नवी दिल्लीत झालेली इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन आणि अबुधाबीचे युवराज खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नह्यान यांची भेट केवळ औपचारिक कूटनीती मानून चालणार नाही. काही दिवसांपूर्वीच इराणकडून यूएईमधील लष्करी ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले होते. अशा पार्श्वभूमीवर दोन्ही देशांनी तणाव कमी करण्याच्या दिशेने संवाद साधणे हा इठ्ठखउडसाठी आणि भारतासाठी महत्त्वाचा राजनैतिक क्षण आहे.

पण या सगळ्यात भारताची खरी कसोटी आहे. कारण पश्चिम आशियातील युद्ध भारतापासून हजारो किलोमीटर दूर असले, तरी त्याचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. इराण–यूएई तणाव वाढला, समुद्री मार्गांवर अस्थिरता निर्माण झाली किंवा होर्मुझच्या आखातातील वाहतूक विस्कळीत झाली, तर कच्च्या तेलाच्या किंमती, आयात खर्च, पेट्रोल–डिझेलचे दर, महागाई आणि रुपयावर दबाव वाढण्याचा धोका आहे. भारतासाठी ऊर्जा सुरक्षा ही त्यामुळे परराष्ट्र धोरणाइतकीच आर्थिक गरज बनली आहे. इठ्ठखउड घोषणेतही ऊर्जा पुरवठा, जागतिक व्यापार आणि पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. याच वेळी नवी दिल्ली घोषणापत्राने गाझामधील सुरू असलेल्या हिंसाचाराबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आणि पॅलेस्टिनी नागरिकांचे जबरदस्तीने विस्थापन रोखण्याचे आवाहन केले. मात्र अमेरिकेसारख्या प्रमुख घटकाचा थेट उल्लेख टाळण्यात आला. म्हणजेच इठ्ठखउडने भूमिका घेतली, पण ती भूमिका कोणत्याही एका शक्तीविरुद्ध उघड संघर्षाची बनू नये, याची काळजी घेतली गेली.

भारतासाठी ही 'सर्वांशी मैत्री, कोणाशीही उघड संघर्ष नाही' अशी कसरत आहे. एका बाजूला अमेरिका आणि पश्चिमी देशांशी वाढते आर्थिक–सामरिक संबंध, दुसरीकडे रशिया आणि इराणशी ऊर्जा, व्यापार व रणनीतिक हितसंबंध; आणि त्याचवेळी यूएईसारखा महत्त्वाचा आखाती भागीदार. नवी दिल्लीत इराण–यूएई संवाद घडवून आणणाऱ्या इठ्ठखउड व्यासपीठामुळे भारताची मध्यस्थीची प्रतिमा मजबूत होऊ शकते. पण पश्चिम आशियातील युद्ध लांबले, तर त्याची किंमत भारतीय ग्राहक, उद्योग आणि सरकारी तिजोरीला चुकवावी लागू शकते. दिल्लीचा कूटनीतिक विजय आर्थिक संकटात बदलू नये, हीच भारतासमोरील खरी परीक्षा आहे.

## दुष्काळसदृश परिस्थितीचा तात्काळ अहवाल सादर करा
### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे १८ जिल्हाधिकाऱ्यांना आदेश; पिकांचे नुकसान, चारा टंचाईसह परिस्थितीचा घेतला आढावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नागपूर : प्रतिनिधी

राज्यातील १८ जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) आढावा घेतला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेऊन तातडीने उपाययोजना करता याव्यात, यासाठी पिकांचे नुकसान आणि सद्यस्थितीचा मुद्देसूद व सविस्तर अहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या जिल्ह्यांमध्ये अहिल्यानगर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, बीड, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर आणि नंदुरबार या १८ जिल्ह्यांचा समावेश आहे.

आढाव्यात मराठवाड्यात सोयाबीन, कापूस, तूर, हळद, उडीद आणि मूग, तर विदर्भात कापूस, मूग, उडीद आणि तूर पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. नागपूर व अमरावती जिल्ह्यांतील संत्रा पिकालाही फटका बसला आहे. ढगाळ वातावरणामुळे संत्रा पिकावर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याची माहिती देण्यात आली.

धाराशिव, बीड आणि जालना जिल्ह्यांत जनावरांसाठी चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे. ऊस कारखाने लवकर सुरू झाल्यास गळीत हंगामाचा कालावधी कमी होऊन भविष्यात चाराटंचाई निर्माण होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली. सोलापूर जिल्ह्यात कांदा लागवड घटण्याचा अंदाज आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन तातडीने अहवाल सादर करावा. प्राप्त अहवालाच्या आधारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून प्रभावी उपाययोजना करण्यात येतील, असे बावनकुळे यांनी सांगितले.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या सूचनांचाही विचार करून त्यांच्या सहकार्याने दुष्काळसदृश परिस्थितीवर आवश्यक त्या उपाययोजना प्राधान्याने राबविण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## सीमेवर चीनची सैन्यतैनाती कमी, पण धोका कायम!
### १० संयुक्त युद्धसज्ज तुकड्या अजूनही प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

भारत–चीन सीमेवरील तणाव काहीसा कमी झाल्याचे चित्र दिसत असले, तरी संरक्षण मंत्रालयाच्या ताज्या अहवालामुळे या सीमेवरील परिस्थितीबाबत सावध राहण्याची गरज पुन्हा स्पष्ट झाली आहे. २०२५ मध्ये भारताच्या उत्तरेकडील सीमेजवळ चीनच्या जनमुक्ती सेनेची तैनाती लक्षणीयरीत्या कमी झाली. मात्र, चीनने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ आणि आपल्या पारंपरिक प्रशिक्षण क्षेत्रांमध्ये संयुक्त युद्धसज्ज सैन्याच्या आकाराच्या दहा तुकड्या कायम ठेवल्या आहेत.



याचा सरळ अर्थ असा की चीनने सैन्य कमी केले असले, तरी त्याने सीमेवरील आपली लष्करी क्षमता पूर्णपणे मागे घेतलेली नाही. गरज पडल्यास मोठ्या संख्येने सैनिक आणि युद्धसामग्री पुन्हा सीमेवर आणण्याची क्षमता चीनकडे कायम आहे. त्यामुळे ही कायमस्वरूपी माघार आहे की परिस्थितीनुसार केलेली लष्करी फेरमांडणी, याकडे भारताला अत्यंत बारकाईने पाहावे लागणार आहे.

संरक्षण मंत्रालयाच्या २०२५–२६च्या वार्षिक अहवालानुसार, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या सर्व भागांमध्ये भारतीय लष्कराची तैनाती भक्कम, सज्ज आणि कोणत्याही आकस्मिक परिस्थितीला सामोरे जाण्यास सक्षम आहे. गलवाननंतर भारताने सीमेवर वाढवलेली लष्करी सज्जता आणि पायाभूत सुविधा कमी करण्याची घाई केलेली नाही, ही बाब महत्त्वाची आहे.

दरम्यान, भारत आणि चीन यांच्यातील संवादही विविध पातळ्यांवर सुरू आहे. पंतप्रधानांच्या पातळीवरील चर्चा, विशेष प्रतिनिधींच्या बैठका, लष्करी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चर्चा तसेच सीमेवरील दोन्ही देशांच्या जवानांमधील बैठका यांचा अहवालात उल्लेख आहे.

मात्र चीनची तैनाती कमी झाली म्हणून भारताने निर्धास्त होण्याचे कारण नाही. सीमेवरील खरी शांतता ही सैनिकांची संख्या कमी झाल्याने नव्हे, तर प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर स्थिरता आणि विश्वास निर्माण झाल्याने सिद्ध होते. त्यामुळे भारतासमोर आव्हान स्पष्ट आहेसंवादाचे दरवाजे खुले ठेवायचे, पण सीमेवरील सज्जतेत कोणतीही ढिलाई करायची नाही.

## महाराष्ट्राच्या सह्याद्रीत नवा जीवसाठा उलगडला! पाय नसलेल्या उभयचराची नवी प्रजाती सापडली

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : वृत्तसंस्था

महाराष्ट्राच्या सह्याद्री पर्वतरांगांमध्ये जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाचा शोध लागला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड परिसरातून शास्त्रज्ञांनी पाय नसलेल्या, जमिनीखाली राहणाऱ्या उभयचराची नवी प्रजाती शोधून काढली आहे. या नव्या प्रजातीला गेगेनोफिस चांदगडी असे नाव देण्यात आले आहे.

ही प्रजाती सामान्यतः जमिनीखाली राहणाऱ्या आणि सापासारखी दिसणाऱ्या, मात्र प्रत्यक्षात उभयचर असलेल्या जीवांच्या गटातील आहे. जमिनीखाली लपून राहणाऱ्या या जीवांचा अभ्यास करणे तुलनेने कठीण असल्याने त्यांची जैविक माहितीही मर्यादित आहे. त्यामुळे चंदगड परिसरातून झालेला



हा शोध महाराष्ट्राच्या जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

या प्रजातीचा शोध भारतीय प्राणी सर्वेक्षण संस्था, पुणे येथील पश्चिम विभागीय केंद्र, हलकर्णी येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि गोव्यातील म्हादेई संशोधन केंद्र यांच्या संशोधकांच्या संयुक्त पथकाने लावला आहे.

मात्र, नव्या प्रजातीचा शोध लागणे ही केवळ वैज्ञानिक कौतुकाची बाब नाही. तो सह्याद्रीच्या अद्याप पूर्णपणे न उलगडलेल्या जैवसंपदेचा इशारा आहे. जंगलतोड, बांधकाम, खाणकाम आणि बदलते हवामान यामुळे अधिवास धोक्यात असताना अशा दुर्मीळ जीवांचे संरक्षण अधिक महत्त्वाचे ठरते.

चंदगडच्या मातीत लपलेला हा छोटासा जीव महाराष्ट्राच्या जैवविविधतेची व्याप्ती किती मोठी आहे, याची पुन्हा एकदा जाणीव करून देतो.

# निवडून आले आणि पक्ष बदलला? मग पुढची १० वर्षे निवडणूकबंदी!
## कपिल सिब्बलांचा घोडेबाजाराला लगाम घालण्याचा प्रस्ताव


■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

निवडणुकीत मतदारांच्या विश्वासावर निवडून आल्यानंतर सत्तेच्या गणितानुसार पक्ष बदलणाऱ्या लोकप्रतिनिधींना लगाम घालण्याची मागणी माजी केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ कपिल सिब्बल यांनी केली आहे. केरळमध्ये रविवारी, १३ सप्टेंबर रोजी अखिल भारतीय वकील संघाच्या केरळ राज्य समितीने आयोजित केलेल्या 'घोडेबाजार आणि लोकशाही' या कार्यक्रमात बोलताना सिब्बल यांनी पक्षांतर करणाऱ्या आमदार–खासदारांच्या राजकीय भवितव्यावरच मर्यादा आणण्याचा प्रस्ताव मांडला.

सिब्बल यांच्या मते, एखाद्या लोकप्रतिनिधीने आपला कार्यकाळ सुरू असताना पक्ष बदलला, तर त्याला पुढील पाच किंवा दहा वर्षे निवडणूक लढविण्यापासून आणि लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्यापासून अपात्र ठरवावे. कारण मतदारांनी ज्या पक्षाच्या उमेदवाराला निवडून दिले, तोच प्रतिनिधी नंतर दुसऱ्या पक्षात गेल्यास मतदारांच्या जनादेशाचे काय होते, हा मूलभूत प्रश्न आहे.

पक्षांतरामुळे केवळ सरकारची समीकरणे बदलत नाहीत, तर लोकप्रतिनिधींची मतदारांप्रती आणि स्वतःच्या पक्षाप्रती असलेली जबाबदारीही कमकुवत होते, असा मुद्दा सिब्बल यांनी मांडला.

त्यांनी संविधानातील दहाव्या अनुसूचीची पुनर्रचना करण्याची मागणीही केली. पक्षाचे विलिनीकरण म्हणजे आमदार–




खासदारांचा सामूहिक पक्षत्याग नव्हे, तर प्रत्यक्ष राजकीय पक्षांचे विलिनीकरण असावे, अशी त्यांची भूमिका आहे.

भाषणाच्या सुरुवातीलाच मी एक 'दिमागी नक्षलवादी' आहे, अशी माझी कबुली आहे, असे उपरोधिक विधान करत सिब्बल यांनी राजकीय व्यवस्थेवर थेट प्रहार केला.

भारतामध्ये पक्षांतरबंदीचा कायदा अस्तित्वात असूनही सत्तास्थापनेसाठी होणाऱ्या राजकीय हालचाली आणि आमदारांच्या सामूहिक पक्षांतराचे प्रकार थांबलेले नाहीत. त्यामुळे सिब्बल यांचा प्रस्ताव केवळ शिक्षा वाढवण्याचा मुद्दा नसून मतदारांच्या जनादेशाचे संरक्षण आणि राजकीय नैतिकतेचा प्रश्न पुढे आणतो.

मात्र अशी कठोर निवडणूकबंदी लागू करायची असेल, तर पक्षांतर्गत लोकशाही, मतभेद, राजकीय दडपशाही आणि खऱ्या अर्थाने पक्षविलिनीकरण यांच्यात स्पष्ट कायदेशीर भेद करावा लागेल. अन्यथा पक्षांतर रोखण्याच्या नावाखाली लोकप्रतिनिधींच्या राजकीय स्वातंत्र्यावरच नवा अंकुश निर्माण होण्याचा धोका आहे.

# लग्न झाले नाही म्हणून प्रत्येक वेळी फसवणूक ठरत नाही!
## बीएनएस कलम ६९चा सर्वोच्च न्यायालयाकडून महत्त्वपूर्ण खुलासा; खोटे आश्वासन आणि नंतर बदललेली परिस्थिती यातील फरक स्पष्ट

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

लग्नाचे आश्वासन देऊन लैंगिक संबंध प्रस्थापित केल्यानंतर विवाह न झाल्याच्या प्रत्येक प्रकरणाला फौजदारी गुन्ह्याचे स्वरूप देता येणार नाही. भारतीय न्याय संहिता (इछड), २०२३ मधील कलम ६९चा अर्थ स्पष्ट करताना सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण कायदेशीर सीमारेषा आखली आहे. लग्नाचे आश्वासन देताना आरोपीचा सुरुवातीपासूनच विवाह करण्याचा हेतू नव्हता आणि त्या खोट्या आश्वासनाच्या आधारे संमती मिळवण्यात आली, हे दिसून येणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणात लग्नाचे आश्वासन दिल्यानंतर संबंधित पुरुषाने विवाह करण्यास नकार दिला. मात्र, तक्रारीतील परिस्थितीतून सुरुवातीपासूनच त्याचे आश्वासन खोटे होते किंवा त्याचा विवाह करण्याचा कोणताही हेतू नव्हता, असे स्पष्ट होत नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. नंतर कौटुंबिक कारणांमुळे विवाह होऊ शकला नाही, अशी परिस्थिती होती.

यामुळे सर्वोच्च न्यायालयाने संबंधित प्रकरणातील बीएनएस कलम ६९ अंतर्गत दाखल एफआयआर रद्द केला.

या निकालाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे 'विवाहाचे आश्वासन पूर्ण झाले नाही' आणि 'विवाहाचे आश्वासन सुरुवातीपासूनच खोटे होते' या दोन परिस्थितींमध्ये कायदेशीर फरक आहे. केवळ नंतर विवाह न झाल्यामुळे सुरुवातीचे आश्वासन फसवे होते, असा निष्कर्ष आपोआप काढता येणार नाही.

बीएनएस कलम ६९मध्ये फसव्या मार्गाने किंवा खोटे आश्वासन देऊन मिळवलेल्या संमतीच्या आधारे लैंगिक संबंध प्रस्थापित करण्यास दंडनीय गुन्हा ठरवण्यात आला आहे. त्यामुळे या तरतुदीचा गाभा केवळ विवाह न होण्यात नसून संमती मिळवताना फसवणुकीचा हेतू होता का, यामध्ये आहे.

मात्र, या निर्णयाचा अर्थ महिलांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करावे किंवा लग्नाचे आश्वासन देऊन संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीला कायद्यापासून संरक्षण मिळते, असा अजिबात नाही. जर एखाद्या प्रकरणात सुरुवातीपासूनच विवाह करण्याचा कोणताही हेतू नसताना जाणीवपूर्वक खोटे आश्वासन देऊन लैंगिक संबंधासाठी संमती मिळवली गेल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसत असेल, तर कलम ६९ लागू होऊ शकते.

याच कारणामुळे तपास यंत्रणांसमोरही महत्त्वाची जबाबदारी येते. नातेसंबंधाचा शेवट झाला एवढ्यावरच गुन्ह्याचा निष्कर्ष काढायचा की, सुरुवातीच्या आश्वासनामागील हेतू आणि त्या काळातील परिस्थिती तपासायची? न्यायालयाने दुसऱ्या दृष्टिकोनाला महत्त्व दिले आहे.

लग्नाचा निर्णय अनेकदा कुटुंबीयांचा विरोध, आर्थिक परिस्थिती, सामाजिक दबाव किंवा अन्य अनपेक्षित कारणांमुळे बदलू शकतो. अशा परिस्थितीत प्रत्येक अपयशी नात्याला फौजदारी फसवणुकीचे स्वरूप दिल्यास कायद्याचा हेतूच विपरीत परिणामाला सामोरा जाऊ शकतो.

त्याचवेळी, खोटे आश्वासन देऊन एखाद्या महिलेची संमती मिळवली गेली असल्यास त्याची गंभीर दखल घेणेही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे पीडितेचा अनुभव आणि आरोपीचा सुरुवातीचा हेतू दोन्हींची वस्तुनिष्ठ तपासणी हीच न्याय्य भूमिका ठरते.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय त्यामुळे विवाहाच्या आश्वासनाशी संबंधित प्रकरणांसाठी महत्त्वाचा मार्गदर्शक ठरणार आहे. विवाह झाला नाही, हा शेवटचा परिणाम आहे; पण बीएनएस कलम ६९ लागू करण्यासाठी न्यायालयाला सुरुवातीचा हेतू तपासावा लागेल. हाच या निकालाचा मूलभूत कायदेशीर संदेश आहे.